# मिरा-भाईंदर,वसई- विरार आयुक्तालय

विषय :- दिनांक- **०७/१२/२०२२** रोजीचे पेपर कात्रणाबाबत.

१) गुन्हेगारी घटना  २) कायदा व सुव्यवस्था ३) राजकीय घटना ४) इतर

| अ. क्र. | दिनांक | वर्तमान पत्राचे नांव | बातमीचा मथळा (Heading) | संबंधीत पो.ठाणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | ०७.१२.२०२२ | पुण्यनगरी पा. नं .०१ | सीमावादाचा भडका | इतर | |
| २. | ०७.१२.२०२२ | पुण्यनगरी पु. पा. ०१ | बनावट चावीनं चोरी करणा-यास अटक | काशिमीरा | |
| ३. | ०७.१२.२०२२ | लोकमत पु. पा. ०४ | पुरूषांचाही होतो मानसिक,शारीरिक छळ.,५८ तक्रारी | मि.भा.व.वि. | |
| ४. | ०७.१२.२०२२ | लोकमत पु. पा. ०४ | भाईंदरमध्ये नोकरीसाठी बोलावमन लुटले | भाईंदर | |
| ५. | ०७.१२.२०२२ | पुढारी पा. नं .०४ | भाईंदरमध्ये भिंत पडून कामगाराचा मृत्यू | भाईंदर | |
| ६. | ०७.१२.२०२२ | लोकसत्ता पु. पा .०१ | विकासाच्या प्रकल्पात तीन हजार वृक्षांचे बळी | वसई-विरार | |
| ७. | ०७.१२.२०२२ | लोकमत पु. पा. ०४ | रेल्वेत नोकरीच्या जाहिराती लावून बेरोजगाराला लुटले | नवघर | |
| ८. | ०७.१२.२०२२ | लोकसत्ता पु. पा. ०३ | "मेट्रो९"ची कारशेड राई-मुर्धा-मोर्वामध्येच | भाईंदर | |
| ९. | ०७.१२.२०२२ | लोकसत्ता पु. पा. ०३ | सराफा पेढी लुटणारा अटकेत | नालसोपारा | |
| १०. | ०७.१२.२०२२ | लोकसत्ता पु. पा .०१ | वसईत अखेर पारपत्र कार्यालय सुरू | वसई-विरार | |

पुण्यनगरी पा.नं.१.

# सीमावादाचा भडका !

## कर्नाटकी मुजोरीमुळे महाराष्ट्रात संतापाची लाट, गाड्यांवरील हल्ल्याला प्रत्युत्तर

**। मुंबई** : महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनावर कोणत्याही अनुचित घटनांचे सावट पडू नये, याकरिता राज्य सरकारच्या दोन मंत्र्यांनी आपला नियोजित बेळगाव दौरा रद्द केला. संयमी महाराष्ट्राची मंगळवारी पुन्हा कन्नड अस्मितावाद्यांनी कळ काढली. बेळगावातील टोलनाक्यावर महाराष्ट्रातून गेलेल्या ट्रकवर कन्नड रक्षण वेदिकेच्या कार्यकर्त्यांनी दगडफेक केली. ट्रकचालकांच्या अंगावर शाईफेक केली. महाराष्ट्र एकीकरण समितीच्या कार्यकर्त्यांना बेळगावात अटक करण्यात आली. या घटनांची राज्यात संतप्त प्रतिक्रिया उमटली असून यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी



आक्रमक भूमिका घेऊन २४ तासांत महाराष्ट्रातील वाहनांवरील हल्ले थांबवावेत, असा सज्जड दम कर्नाटक सरकारला भरला. दुसरीकडे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांना दूरध्वनी करून तीव्र नाराजी व्यक्त केली. यानंतर बोम्मई यांनी सावध भूमिका घेत हल्लेखोरांवर कडक कारवाईचे आश्वासन दिले.

पुण्यनगरी पृ.पा.१.

# बनावट चावीने चोरी करणाऱ्यास अटक

**। मीरा रोड** : काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत बनावट चावीने घर उघडून दागिने व रोख रक्कम असा ५ लाख १६ हजारांची चोरी करणाऱ्यास पोलिसांनी अटक केली असून, मुद्देमाल जप्त केला आहे. तक्रारदार प्रियंका विकी सिंग २४ नोव्हेंबरला कामानिमित्त घराबाहेर होत्या. अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराचा दरवाजा बनावट चावीने उघडून कपाटातील एकूण २,३६,००० रुपयांचे सोन्याचे दागिने व २,८०,००० रुपये रोख रक्कम असा एकूण ५,१६,००० रुपयांचा मुद्देमाल चोरी करून पोबारा केला. याबाबत काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

काशिमीरा पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी सपोनि. प्रशांत गांगुर्डे व त्यांच्या पथकाने तपास करून अभिषेक राजेंद्र सिंग यास ताब्यात घेऊन चौकशी केली. तक्रारदाराची मावस बहीण महेक सिंग हिचा तो मित्र होता. त्यामुळे त्याचे येणे-जाणे होते.

महेक सिंग ही तिच्या गावी फतेहबाद, दिल्ली या ठिकाणी निघून गेली असताना चोरट्याने महेक सिंग गावी जाण्यापूर्वी संधीचा फायदा घेत तक्रारदाराच्या घराची चावी प्राप्त करून तक्रारदार कामानिमित्त बाहेर गेल्या असताना बनावट चावीने दरवाजा उघडून चोरी केल्याचे उघड झाले. अभिषेक राजेंद्र सिंग याने गुन्हा केल्याने त्यास अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याबाबत चौकशी केली असता, त्याने सोन्याचे दागिने त्याचा मित्र प्रभात विष्णू सिंग याच्याकडे ठेवण्यास दिल्याचे सांगितले. या गुन्ह्यात चोरी केलेला मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

लोकमत ५.५१.४

# पुरुषांचाही होतो मानसिक, शारीरिक छळ; ५८ तक्रारी

**धीरज परब**

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**मीरा रोड :** महिलांसाठी कायदे, नियम, आयोग, समित्या कार्यरत असतात; परंतु पुरुषांचा होणारा छळ मात्र दुर्लक्षित केला जातो. कारण पुरुषांना त्यांच्या मानसिक, शारीरिक छळाविरोधात न्याय मागण्यासाठी प्रभावी असे कायदे नाहीत. २६ नोव्हेंबर हा 'आंतरराष्ट्रीय पुरुष दिन' साजरा करण्यात आला. यानिमित्त पुरुषांचा होणारा छळ चर्चेला आला. पुरुषांच्या महिलांविरुद्ध छळाच्या तक्रारींचा आढावा घेतला असता मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या भरोसा सेलकडे जानेवारी ते ऑक्टोबर या दहा महिन्यांत ५८ तक्रारी आल्या. त्यापैकी ५६ तक्रारी निकाली काढण्यात आल्या असून, दोन तक्रारी प्रलंबित आहेत.

महिलांच्या तक्रारींवर सामोपचाराने निर्णय झाला नाही तर भरोसा सेलकडून पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याकरिता पाठवले जाते. पुरुष पती व त्याच्या कुटुंबीयांवर गुन्हे दाखल होतात; परंतु पुरुषांच्या तक्रारींवर गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही होत नाही. कारण कायद्यात तरतूद नसल्याचे सांगितले जाते.



## ५६ तक्रारी निकाली

पोलिसांच्या भरोसा सेलकडून ५८ तक्रार अर्जांपैकी ५६ तक्रार अर्ज निकाली काढण्यात आले असून, केवळ दोन तक्रार अर्ज प्रलंबित आहेत.

## बायको मानसिक, शारीरिक छळ करते

- पोलिसांकडे येणाऱ्या पुरुषांच्या तक्रार अर्जामध्ये बायकोला एकत्र कुटुंबापासून वेगळे राहायचे म्हणून भांडण, शिवीगाळ करणे, घरात आई-वडील यांची काळजी न घेता त्यांच्याशी भांडणे व वाईट वर्तणूक देणे, मुलांची योग्य काळजी न घेणे आदी स्वरूपाच्या तक्रारी असतात.
- माहेरची मंडळी बायकोला भडकवतात, माहेरी निघून गेलेली बायको पुन्हा नांदायला न येणे, बायकोचे बाहेर प्रेम प्रकरण असल्याच्या तक्रारींपासून वेगळी राहणारी बायको मुलांना भेटू देत नाही, अशा तक्रारी पुरुषांकडून होत असतात.

## भरोसा सेलकडे दहा महिन्यांत ५८ तक्रारी

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या भरोसा सेलकडे पुरुषांनी ५८ तक्रार अर्ज जानेवारी ते ऑक्टोबर या १० महिन्यांत केले.




अनेक प्रकरणांत चूक नसताना महिला पुरुषास नाहक त्रास देतात. पुरुषांवर अन्याय होतो आहे हे दिसत असते; पण इलाज नसतो. कारण पुरुषांना न्याय मिळावा, असा प्रभावी कायदाच नाही. याची खंत गेल्या २५ वर्षांच्या माझ्या वकिली पेशांत व महिला समित्यांवर काम करताना जाणवते.

**- सुमिता चिलवेरी,** वकील, महिला सुरक्षा समिती सदस्य, व भरोसा सेलच्या माजी सदस्य

# भाईंदरमध्ये नोकरीसाठी बोलावून लुटले

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**मीरा रोड :** नोकरी देतो, असे सांगून एका ३० वर्षीय बेरोजगारास धमकावून लुटल्याचा गुन्हा मीरारोडच्या नयानगर पोलीस ठाण्यात दाखल झाला आहे.

भाईंदर पश्चिमेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरनगरमध्ये राहणारा मुकेश हरिजन हा सध्या बेरोजगार असल्याने नोकरी शोधत होता. फेसबुकवरील एका जाहिरातीमधील क्रमांकावर त्याने कॉल केला असता नितेश तिवारी असे नाव सांगणाऱ्या व्यक्तीने भाईंदर पश्चिमेच्या डी-मार्ट भागात नोकरी असून, कार्यालयात ये, असे सांगितले. मुकेश हा उड्डाणपूल ओलांडून पूर्वेच्या नर्मदा पॅरेडाइज इमारतीत तिवारीने सांगितले तेथे गेला. त्याठिकाणी तिवारीची त्याची भेट झाली.

तिवारीने तेथे मुकेशला शिवीगाळ दमदाटी करत १५ हजार रुपये आपणास ट्रान्सफर कर, असे सांगितले. मुकेशने त्याच्या दिलीप या भावास कॉल करून पैसे पाठविण्यास सांगितले असता त्याने पाठविले नाहीत. त्यामुळे चिडलेल्या तिवारीने मुकेशचा मोबाइल घेऊन पळ काढला. या मोबाइलच्या कव्हरमध्ये दोन हजारांची नोट होती. याप्रकरणी दि. ३ डिसेंबरला नयानगर पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुढारी ५१.नं.४

# भाईंदरमध्ये भिंत पडून कामगाराचा मृत्यू

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदर पश्चिमेच्या पपैय्या मैदानात एका धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी एक भिंत बनवण्यात आली होती. ती भिंत पडून एका शैलेश गुप्ता (२५) या कामगाराचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

भाईंदर पश्चिमेच्या पपैय्या मैदानात दोन दिवसापूर्वी एका धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्या कार्यक्रमासाठी स्टेजच्या बाजूला एक भिंत बनवण्यात आली होती. ती भिंत तोडण्यासाठी शैलेश गुप्ता हा मजूर सोमवारी गेला होता. तो रात्री घरी आला नाही म्हणून त्याच्या नातेवाईकांनी चौकशी केली असता मंगळवारी दुपारी शैलेशचा त्या भिंतीच्या खाली मृतदेह आढळून आला. शैलेशला पाच दिवसांपूर्वी मुलगी झाली होती. मुलगी झाल्याचा आनंद व्यक्त करत असतानाच शैलेशचा मृत्यू झाला आहे. पाच दिवसाच्या मुलीचे वडिलांचे डोक्यावरचे छत्र हरवल्याने परिसरातील नागरिकांनी हळहळ व्यक्त केली आहे. शैलेशचा मृत्यू भिंत पडून झाला की कोणी हत्या केली याचा तपास पोलिसांनी करून गुन्हेगारांवर कारवाई करण्याची मागणी त्याच्या नातेवाईकांनी केली आहे.

लोकसत्ता पृ.पा.9.

# विकासाच्या प्रकल्पात तीन हजार वृक्षांचे बळी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**विरार :** वसई-विरार महानगरपालिकेने नुकतीच शहरातील वृक्षगणनेची घोषणा केली आहे. असे असताना पालिकेकडून विकासाच्या प्रकल्पात अडथळा ठरणारी वृक्ष तोडण्याचा घाट घातला आहे. बुलेट ट्रेन आणि मुंबई-बडोदा महामार्ग रुंदीकरणाच्या कामात बाधित होणारी तीन हजार २६९ झाडे तोडली जाणार आहेत. यासाठी नागरिकांच्या हरकती मागविण्यात आल्या आहेत. लवकरच शासनाला याचा प्रस्ताव सादर केला जाणार आहे.

वसई-विरार महापालिकेने मागील सात वर्षांपूर्वी केलेल्या वृक्षगणनेनुसार पालिकेच्या मालकीची शहरात केवळ चार टक्के वृक्ष आहेत. पालिकेने इतक्या वर्षांत राबविलेले वृक्षारोपणाचे प्रयोग अयशस्वी ठरले आहेत. असे असताना प्रकल्पाच्या नावाने होणारी झाडांची कत्तल यामुळे पर्यावरण धोक्यात येणार असल्याची खंत वृक्षप्रेमींनी व्यक्त केली आहे.

## बाधित होणारी झाडे

पालिकेच्या वतीने वृक्षतज्ज्ञांच्या साहाय्याने या बाधित झाडांची पाहाणी केली आहे. यात २० ते ५० वयोगटातील झाडे असून त्यात प्रामुख्याने आंब्याची ३५६, असुपालव ९९, आवळा २७३, चिंच ११७, इअरलिफ ॲकेशिया १०२, करंज ७०, सुबाभूळ १७९, विलायती चिंच ५०, असाणा १११, साग २९३ याचबरोबर नारळ, ताड, काजू, बदाम, कडुलिंब, पिंपळ, उंबर इत्यादी अनेक झाडांचा समावेश आहे.

पालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागाकडून दिलेल्या माहितीनुसार मुंबई-बडोदा राष्ट्रीय महामार्ग रुंदीकरण प्रकल्पात शिरसाड ते मासवण या पट्ट्यातील रस्त्याच्या विकासकामासाठी १९०६ झाडे बाधित होत आहेत. यात शिरसाड, काशिद कोपर, मांडवी, कोशिंबे आणि चांदिप गावांचा समावेश आहे. तर मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पात १३६८ झाडे बाधित होत असून त्यात गोखिवरे, बिलाल पाडा, मोरे, ससुनवघर या गावांचा समावेश आहे.

इतक्या मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करताना पालिकेला शासनाची परवानगी घ्यावी लागत असल्याने पालिकेने जाहिरात देऊन नागरिकांच्या हरकती मागविल्या आहेत. मात्र अद्याप कुणीही हरकत नोंदविल्याचे पालिकेच्या अभियंता रंजीत वर्तक यांनी सांगितले आहे. हरकतीनंतर सुनावणी केल्या जातील आणि त्यानंतर शासनाला प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे. शासनाच्या सूचनेनुसार झाडांची पूर्ण लागवड केली जाणार आहे. पण पालिकेच्या या निर्णयाला वृक्षप्रेमींनी विरोध दर्शविला आहे. पर्यावरण संवर्धन समिती मॅकेन्झी डाबरे यांनी सांगितले की, हा विकास नसून पर्यावरणाचा ऱ्हास आहे, वाढत्या तापमानाचा पृथ्वीला धोका असताना इतक्या मोठ्या प्रमाणात झाडे तोडल्याने शहरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होणार आहे. यामुळे पालिकेने याचा पुन्हा विचार करावा, असे त्यांनी सांगितले.

लोकमत पृ.पा.४.

# रेल्वेत नोकरीच्या जाहिराती लावून बेरोजगाराला लुटले

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** रेल्वे स्थानकात नोकरीसाठी जाहिरात लावून गरजूकडून पैसे उकळत त्यांची फसवणूक करणाऱ्या एकाविरुद्ध भाईंदरच्या नवघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेप्रकरणी पोलिसांनी तपास सुरु केला आहे.

विरारमधील फुलपाडा भागात राहणारा सिद्धेश कळंबटे (वय १९) याला विरार रेल्वे स्थानकात नोकरीची जाहिरात लावलेली दिसली. त्यावर कॉल केला असता प्रवीण यादव याने त्याच्या भाईंदर पूर्वेच्या शनी मंदिरजवळ अशोक शॉपिंग सेंटरमधील कार्यालयात बोलावले. त्या ठिकाणी वसईत सुरक्षारक्षकाची नोकरी देतो, असे सांगून २,६०० रुपये शुल्क घेतले; परंतु, यादव याने नोकरी दिली नाही. याउलट सिद्धेश याला त्याच्या स्वतःच्या कार्यालयात काम करण्यास सांगितले.

यादवच्या कार्यालयात काम करू लागला असता वेलेरियन कस्तलिनो व परेश मोरघा यांनासुद्धा यादवने नोकरीला लावतो, असे सांगून पैसे घेऊन फसवल्याचे सिद्धेशच्या लक्षात आले. यादव याने नोकरीच्या जाहिराती करून पैसे घेऊन नोकरी न देता फसवणूक केल्याप्रकरणी सिद्धेशच्या फिर्यादीनंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी नवघर पोलिस तपास करत आहेत.

लोकसत्ता ५.पा.३०

# 'मेट्रो ९'ची कारशेड राई-मुर्धा-मोर्वामध्येच?

## स्थानिकांचे तिन्ही पर्याय अव्यवहार्य - एमएमआरडीएचा अहवाल

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** 'दहिसर पूर्व - मिरारोड मेट्रो ९' आणि 'दहिसर - अंधेरी मेट्रो ७' मार्गिकांतील कारशेड भाईंदर येथील राई, मुर्धा, मोर्वा येथेच उभारण्यात येण्याची शक्यता आहे. येथील स्थानिक रहिवाशांनी कारशेडसाठी सुचविलेले तिनही पर्याय अव्यवहार्य असल्याचे एमएमआरडीएच्या अहवालात नमुद करण्यात आले आहे. एमएमआरडीएने हा अहवाल नगर विकास विभागाला सादर केला आहे. आता नगर विकास विभाग याबाबत कोणता निर्णय घेतो यावर कारशेडचे भवितव्य अवलंबून आहे.

'मेट्रो ९' आणि 'मेट्रो ७'ची कारशेड भाईंदर येथील राई, मुर्धा आणि मोर्वा या गावांतील गावठाणांच्या ३२ हेक्टर जागेत उभारण्यात येणार आहे. मात्र या कारशेडला स्थानिक रहिवाशांनी विरोध केला आहे. या पार्श्वभूमीवर काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेशातील रखडलेल्या कारशेडबाबत एक बैठक घेतली होती. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी स्थानिका रहिवाशांच्या मागणीनुसार 'मेट्रो ९' आणि 'मेट्रो ७'च्या कारशेडसाठी तीन पर्यायांचा अभ्यास करून सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. एमएमआरडीएने या तिन्ही पर्यायांचा अभ्यास केला असून यासंबंधीचा सविस्तर अहवाल तयार केला आहे. हा अहवाल नुकताच नगर विकास विभागाकडे सादर करण्यात आला आहे. अहवाल सादर करण्यात आल्याच्या वृत्ताला महानगर आयुक्त एस.व्ही.आर. श्रीनिवास यांनी दुजोरा दिला आहे.

राई, मुर्धा, मोर्वा गावांतील रहिवाशांनी 'मेट्रो ९' मार्गिकेतील शेवटच्या नेताजी सुभाषचंद्र बोस स्थानकालगतच्या राधा स्वामी सत्संगची जागा, याच परिसरातील मिठागराची जागा आणि उन्नत येथील खोपरा गावातील जागा असे तीन पर्याय सरकारला सुचविले होते. मात्र हे तिन्ही पर्याय तांत्रिक आणि आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य असल्याचे अहवालात नमूद करण्यात आल्याची माहिती एमएमआरडीएतील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. एकूणच हे तिन्ही पर्याय अमान्य करण्यात आल्याने आता 'मेट्रो ९' आणि 'मेट्रो ७'ची कारशेड राई, मुर्धा, मोर्वा येथेच होण्याची दाट शक्यता आहे. आता नगरविकास विभाग याबाबत कोणता निर्णय घेतो यावर या कारशेडचे भवितव्य अवलंबून आहे.

# सराफा पेढी लुटणारा अटकेत

**विरार :** नालासोपाऱ्यात २९ नोव्हेंबर नकली पिस्तुलाच्या धाकाने सोन्याची पेढी लुटणाऱ्या आरोपीला नालासोपारा पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक केली आहे. त्याच्याकडून एक लाख ९८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पश्चिमेकडील पाटणकर परिसरातील नेकलेस नावाच्या सोन्याच्या पेढीत भरदिवसा एका अज्ञात इसमाने चोरी केली होती. ग्राहक बनून तो पेढीत शिरला आणि पिस्तुलाच्या धाक दाखवत दागिने लुटले होते. त्याच्या हातातले पिस्तूल नकली असल्याचे समजतात मालकाने त्याला विरोध करण्याचा प्रयत्न केला होता. पण मालकाला मारहाण करून तो पळून गेला होता

पोलिसांनी या आरोपीला पकडण्यासाठी चार पथके तयार केली होती. तांत्रिक विश्लेषणावरून पोलिसांनी आरोपी कमलेश रामानंद गुप्ता याला दिवा ठाणे येथून अटक केली.

लोकसत्ता ५.पा.९.

# वसईत अखेर पारपत्र कार्यालय सुरू

## दिवसाला ४० जणांना अर्ज करण्याची सुविधा

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई :** मागील काही वर्षांपासून प्रतीक्षेत असलेले पारपत्र कार्यालय अखेर वसईतील एव्हरशाईन येथे सुरू करण्यात आले आहे. मंगळवारी केंद्रीय परराष्ट्र आणि संसदीय कामकाज राज्यमंत्री व्ही. मुरलीधरन यांच्या हस्ते कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. सद्यःस्थितीत या ठिकाणी दिवसाला ४० जण



पारपत्रासाठी अर्ज दाखल करू शकतील, अशी सुविधा करण्यात आली आहे.

पालघर जिल्ह्यातील नागरिक विदेशात फिरण्यासाठी, व्यवसायासाठी, शिक्षणासाठी जात असतात. त्यासाठी पारपत्राची गरज भासते; परंतु जिल्ह्यात पारपत्र काढण्यासाठी कोणतीही सुविधा उपलब्ध नसल्याने ठाणे व मालाड येथे जावे लागत होते. त्यात वेळ आणि पैसा या दोन्ही गोष्टी वाया जात असतात. शहरात स्वतंत्र पारपत्र कार्यालय सुरू करण्याची मागणी येथील नागरिक गेल्या अनेक वर्षांपासून करीत होते. याबाबत पालघर जिल्ह्याचे खासदार राजेंद्र गावित यांनीही पाठपुरावा सुरू केला होता. या प्रसंगी राजेंद्र गावित यांच्यासह प्रादेशिक पारपत्र अधिकारी मुंबई डॉ. राजेश गवांडे, नवी मुंबई टपाल विभाग अधिकारी सुश्री सरन्या, पोलीस सहआयुक्त श्रीकांत पाठक, प्रांताधिकारी स्वप्निल तांगडे, तहसीलदार उज्ज्वला भगत यांसह इतर मान्यवर उपस्थित होते.